# निर्माण समूहातर्फे जिल्ह्यात रोजगार हमी जनजागरण




पथनाट्य सादर करताना निर्माण युवा समूहाचे कार्यकर्ते.

गडचिरोली, दि. २२ (प्रतिनिधी) – महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात कार्यरत निर्माण हा युवा समूह व गडचिरोली जिल्ह्यातील डॉ. अभय व राणी बंग यांची सर्च ही स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेबाबतीत जनजागरणासाठी काम मागा, प्रगती साधा हे पथनाट्य मागील आठवड्यात सादर करण्यात आले.

गडचिरोली तालुक्यातील ८ गैरआदिवासी व धानोरा तालुक्यातील ७ आदिवासी गावातील जवळजवळ ३ हजार. ५०० लोकांनी या पथनाट्यास उपस्थिती दर्शविली. पथनाट्यास लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लोकांना रोजगाराचा हक्क मागण्याची समज व प्रेरणा मिळाली.

पथनाट्याच्या काही दिवस आधी या गावातील कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात आल्या होत्या. पथनाट्यात रोजगाराचा हक्क, कामाची आगाऊ व सामूहिक मागणी या गोष्टींवर भर देण्यात आला. लोकगीते व चित्रपटगीतांचा उपयोग करून योजनेतल्या अडचणी व त्यातील उपाय लोकांसमोर मांडण्यात आले. पथनाट्यानंतर लोकांशी झालेल्या खुल्या संवादातून लोकांना असलेली कामाची गरज प्रकर्षाने समोर आली. त्यातूनच गावागावात कार्यकर्त्यांच्या समित्या घोषित झाल्या असून यापुढे निर्माण समूह या समित्यांसोबत गावागावात काम करणार आहे.

लोकांना पेरणीनंतरचा सप्टेंबर ते ऑक्टोबर व उन्हाळ्यात फेब्रुवारी ते एप्रिल अशा पाच महिन्यांसाठी रोजगाराची गरज असते. यावर्षी कमी पावसामुळे जिल्ह्यात दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली असून लोकांना रोजगाराची गरज जानेवारीपासूनच आहे. या भूमिकेतूनच निर्माण समूह पुरस्कृत फेलोशिप कार्यक्रम अंतर्गत गोपाल महाजन, अमृत बंग व प्रियदर्शन सहस्त्रबुद्धे हे युवक महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यक्रम अंमलबजावणीसाठी प्रयत्न करीत आहेत. काम मागा, प्रगती साधा हे पथनाट्य या प्रयत्नांचाच एक भाग होता.

निर्माण समूहाने जिल्हाधिकारी निरंजनकुमार सुधांशू यांची भेट घेतली. त्यांनी देखील निर्माण समूहाच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले. निर्माण समूह हा डॉ. अभय व राणी बंग यांच्या पुढाकाराने व महाराष्ट्रातील 'अनेक व्यक्ती, सामाजिक संस्था आणि संघटनांच्या सहकार्याने गेल्या दोन वर्षापासून कार्यरत आहे. या पथनाट्यात महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागातून आलेल्या सायली तामणे, सनत गानू, स्वरमुग्धा भागवत, नीरजा बापट, अश्विनी महाजन, पवन पाटील व सागर जोशी या उच्चशिक्षित व नाट्यरुची असणाऱ्या युवा निर्माणींनी सहभाग घेतला. हे युवक–युवती निर्माण शिबिरादरम्यान जिल्ह्यात आधीही येऊन गेले असून येथील गावांमध्ये प्रत्यक्ष राहिले आहेत. या पथनाट्याद्वारे या युवांनी गडचिरोलीच्या लोकांशी व त्यांच्या प्रश्नांशी प्रत्यक्ष नाते जोडले आहे. पथनाट्याच्या आयोजनात तुषार खोब्रागडे, महेश देशमुख, दत्ता बाळसराफ, आनंदराव दुधबळे, दिवाकर जेंगठे, हरिदास साखरे, महादेव सातपुते, नाजूक झाडे, सचिन नेरकर, विजय मडावी, गुरु मंगर कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.